**महाराष्ट्र शासन**

सहसंचालक (उच्च शिक्षण)

१७ आंबेडकर रोड, कॅम्प, पुणे – ४११ ००१

Website: www.jdhepune.org E-mail – jdhepune@gmail.com

दूरध्वनी क्रमांक – ०२० - २६१२७८३३, ०२०-२६०५१६३२ फॅक्स क्र. ०२०- २६०५१६३२

क्रमांक -राज्यस्तरीय महिला सक्षमीकरण परिषद-२०२३ पुणे विभाग/ दि. १८/१०/२०२३

प्रति,

१. कुलसचिव, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे.
२. कुलसचिव, सर्व विद्यापीठे, पुणे, अहमदनगर व नाशिक जिल्हे.
३. प्राचार्य / प्राचार्या,
सर्व अशासकीय अनुदानित/विनाअनुदानित व कायम विना अनुदानित
कला, वाणिज्य, विज्ञान, विधी व शिक्षणशास्त्र महाविद्यालये,
**पुणे / अहमदनगर व नाशिक जिल्हे.**

विषय - **एकदिवसीय राज्यस्तरीय महिला सक्षमीकरण परिषदेचे आयोजन करणेबाबत..**

संदर्भ - मा. शिक्षण संचालक, उच्च शिक्षण, म.रा. पुणे यांचे पत्र क्र. युएनआय/महिला परिषद/२०२३ /विशि-१/१०१७२ दिनांक - १२.१०.२०२३.

उपरोक्त पत्राची प्रत कृपया अवलोकनी घ्यावी.

संदर्भित पत्राच्या विषयानुषंगाने कळविण्यात येते की, संयुक्त राष्ट्र शाश्वत विकास उद्दिष्टे, महिला सक्षमीकरण आणि उच्च शिक्षण या विषयावर **उच्च व तंत्र शिक्षण विभाग, महाराष्ट्र शासन व सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे यांचे संयुक्त विद्यमाने संयुक्त राष्ट्रसंघ शाश्वत विकास उद्दिष्टे, महिला सक्षमीकरण आणि उच्च शिक्षण या विषयावर दिनांक २३ ऑक्टोबर २०२३ रोजी खाशाबा जाधव क्रिडा संकुल, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे येथे एकदिवशीय महिला सक्षमीकरण परिषदेचे आयोजन करण्यात आलेले आहे.** सदर परिषदेसाठी कार्यक्रमाच्या अध्यक्ष म्हणून डॉ. निलमताई गो-हे, मा. उपसभापती, महाराष्ट्र विधानपरिषद, प्रमुख पाहुणे म्हणून श्री. चंद्रकांतदादा पाटील, मा. मंत्री, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, महाराष्ट्र राज्य आणि मा. श्री. विकास चंद्र रस्तोगी, मा. प्रधान सचिव, उच्च व तंत्र शिक्षण विभाग यांची प्रमुख उपस्थिती असणार आहे.

याकरिता आपल्या विद्यापीठातील व संलग्नित अशासकीय अनुदानित, विना अनुदानित व कायम विनाअनुदानित महाविद्यालयातील सर्व महिला प्राध्यापक (सहाय्यक प्राध्यापक, सहयोगी प्राध्यापक व प्राध्यापक) यांना सदर परिषदेसाठी **सोमवार दिनांक २३ ऑक्टोबर, २०२३** रोजी **खाशाबा जाधव क्रिडा संकुल, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे** येथे **सकाळी ९.००** वाजता उपस्थित राहण्यासाठी सूचित करण्यात यावे तसेच सदर उपस्थित राहणा-या महिला प्राध्यापिकांना सदर एक दिवसाची कर्तव्य रजा मंजूर करण्यात यावी.

Signed by
Kirankumar Laxmanrao Bondar
Date: 18-10-2023 15:43:53

(डॉ. किरणकुमार बोंदर)
सह संचालक (उच्च शिक्षण)
पुणे विभाग, पुणे.

सोबत - संदर्भिय पत्र.